# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

दूरध्वनी क्रमांक :0712-2565403/2560209/2553401/2553360 FAX NO.0712-2561775, www.nagpureduboard.in

विभागीय अध्यक्ष: 2560319/2562766 Email ID : msboardnagpur@gmail.com विभागीय सचिव: 2560319/2560166


पत्र क्रमांक / नाविमं / पमा / 322
दिनांकः 01 /02/ 2020

प्रति,
मा. संचालक
माहिती व जनसंपर्क अधिकारी,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः– मार्च – 2020 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत.

संदर्भः– क्र.रा.म./पराक्षा–7/1498 दिनांक – 31/01/2020.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की मार्च – 2020 मध्ये घेण्यात येणा–या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दुरदर्शन केंद्रांनी बातम्याचे वेळी तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.

(रविकांत देशपांडे)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) .प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती. मा. संपादक, दै.....
..........................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास
आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

विषय :- मार्च २०२० च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२० साठी सर्व विभागीय मंडळातील सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व माध्यमिक शाळांना मार्च २०२० च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahasscboard.in या संकेतस्थळावर शनिवार दिनांक ०१/०२/२०२० पासून school login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. मार्च २०२० साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांनी इ.१० वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
२. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा शिक्का मारून स्वाक्षरी करावी.
३. प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket) विषय व माध्यम बदल असतील तर त्यांच्या दुरुस्त्या माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळात जाऊन करुन घ्यावयाच्या आहेत.
४. प्रवेशपत्रावरील (Hall Ticket) फोटो, स्वाक्षरी, विद्यार्थ्याचे नाव, जन्मतारीख व जन्मस्थळ या संदर्भातील दुरुस्त्या माध्यमिक शाळांनी त्यांच्या स्तरावर करुन त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरीत पाठवावयाची आहे.
५. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.
६. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापकांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

तरी मार्च २०२० मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक ३१/०१/२०२०

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) मार्च / ~~ऑक्टो~~ जुलै ..................

## प्रवेशपत्रात असलेल्या चुकांच्या दुरूस्तीबाबत अहवाल

## प्रपत्र - अ

फोन / दुरध्वनी क्रमांक - - - - - - - - - -

शाळा निर्देशांक..........................................

| शाळेने मंडळास पाठविलेले एकूण आवेदनपत्रे | एकूण प्राप्त प्रवेशपत्रे | नांव, वडील/आईचे नांव, आडनांव, विषय, माध्यम, जन्मतारीख, विषयातील सुट इ. बाबत सविस्तर तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बैठक क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | प्रवेशपत्र व शाळा यादीनुसार मूळ चुकीची नोंद | शाळा दाखल रजिस्टरनुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रात करावयाची प्रस्तावित दुरूस्ती | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्तनुसार रकाना क्र.६ मध्ये विद्यार्थ्यांचे नांव, वडील/आईचे नांव, आडनांव, विषय, माध्यम, जन्मतारीख, विषयातील सुट इत्यादी प्रस्तावित केलेली माहीती बरोबर व अचुक आहे व ती शाळा दाखलखारीज रजिस्टर तसेच विद्यार्थ्यांच्या पुर्वीच्या गुणपत्रिका/ गुणपत्रिका रजिस्टर यावरून तपासण्यात आलेले आहे.

स्थळ :

दिनांक :

मुख्याध्यापक

शाळेचा शिक्का